ग.ज्यो. ८

# पालिचीकारीका श्लोक

ले. पां.बा.पाठक

म. ग्रं. सं. ठाणे

विषय

ग्रंथालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचे नांव

म. ग्रं. सं. ठाणे
विषय गणित-ज्योतिष
क्र. नं. १८४७

[redacted]

# अनुक्रमणिका


| विषय | पृ. | अं. | विषय | पृ. | अं. |
|---|---|---|---|---|---|
| वाहान | १७ | २९ | सरडाचे प्रक० | १९ | ३४ |
| जन्मनक्षत्रादि | १७ | ३० | शांतीचा प्रकार | २१ | ३८ |
| कुयोग | १८ | ३१ | | | |


## स्त्रियांचे शरीराची

२५


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मस्तक | २८ | २ | खालचा होट | ३० | ५ |
| टाळू | | | ओष्ठसंपुट | | |
| वेणी | | | चुबुक | ३० | ६ |
| केशाचे अग्र | | | तोंड | | |
| कान | २८ | ३ | कंठ | | |
| कपाळ | | | काखा | | |
| उ० गाल | | | पाठ | ३१ | ७ |
| डा० गाल | | | कुसी | | |
| उ० कान | २९ | ४ | खांदे | | |
| डा० कान | | | दंड | | |
| उ० नेत्र | | | उ० हात | ३२ | ८ |
| डा० नेत्र | | | डा० हात | | |
| नाक | ३० | ५ | उ० मणगट | | |
| वरचा होट | | | डा० मणगट | ३२ | |

# अनुक्रमणिका


| स्त्रियांची | पृ० | श्लो० | स्त्रियांची | पृ० | श्लो० |
|---|---|---|---|---|---|
| हातांचा मध्य<br>हातांचा पृष्ट<br>नखें | ३२ | ९ | कंबर<br>गुद | ३४ | ११ |
| स्तन<br>हृदय<br>कुक्षी<br>कन्येचें पोट<br>पोट | ३३ | १० | मांड्या<br>गुडघे<br>जंघा<br>घोटे | ३४ | १२ |
| नाभी<br>गुह्य | ३४ | ११ | उ० पाय<br>डा० पाय<br>पायाचीं बोटें<br>पायाचीं नखें | ३५ | १३ |
| दिशाफल | ३७ | | लग्नफल | ४५ | |
| तिथिफल | ३८ | | योगफल | ४६ | |
| वारफल<br>नक्षत्रफल | ४१ | | करणफल | ४७ | |

Eushnaraokotishnsholam Kolhatkar

॥श्री॥

# पालीची कारिका श्लोक

अथातःसंप्रवक्ष्यामिफलंपल्याः
प्रपातने यद्यदंगेनृणांदृष्टंनत्तदे
वविशेषतः॥१॥ गर्गवाराहमांड
व्यनारदाद्यैर्यथोदितं॥तत्तत्कार्यं
विशेषणज्ञातव्यंसुविचक्षणैः॥२॥

अर्थ॥ मनुष्यांच्या अंगावर पाल पतन पावली असतां विशेषें करून काय फळ आहे तें सांगतो॥१॥ गर्ग·वाराह·मांडव्य·नारद·इत्यादिक ऋषी नी जसें फळ सांगीतलें आहे त्याप्रमाणें कुशल पुरुषानी समजावें तेंच आतां मी सांगतो॥२॥

शिरःशिखायांसुखमानतोनिवामे
कपोलेप्रियदर्शनंस्यात् दक्षकपोले
प्रियसंपदोस्यस्यात्केशबंधेपिच
रोगबंधः॥३॥

अर्थ॥ मस्तकावर किंवा शेंडीवर पाल पडलीअ
सतां सुख प्राप्त होतें॥ आणि डाव्या गालावर पड
ली असतां मित्राचें दर्शन होईलअसें जाणावें॥
उजव्या गालावर पडली असतां इष्ट संपत्ति मि
ळती॥ आणि केश बंधाचे ठाईं पडली असतां रो
ग उत्पन्न होतो॥३॥

केशांतेनिधनंप्रोक्तंब्रह्मस्थानेमृ
तिप्रदं॥ललाटेप्रियमाप्नोतिभ्रुवो
स्तुधनहानिकृत्॥४॥

अर्थ॥ केशाच्या अग्रावर पडली असतां नाश जाणावा॥ टाळूवर पडली असतां मरण जाणावें॥ कपाळावर पडली असतां लक्ष्मी प्राप्त होती॥ भ्रुकुटीवर पडली असतां द्रव्य नाश होतो॥ ४॥

धनलाभो भ्रुवोर्मध्ये दक्षिणे नयने शुभं॥ वामे बंधनमाप्नोति वक्त्रे मिष्टान्नभोजनं॥ ५॥

अर्थ॥ भ्रुकुटीच्या मध्यें जर पतन पावली तर द्रव्य लाभ जाणावा॥ उजव्या नेत्रावर पडली असतां शुभ जाणावें॥ आणि डाव्या नेत्रावर पडली असतां बंधन प्राप्त होतें॥ मुखावर पडली असतां मिष्टान्न भोजन मिळेल असें जाणावें॥ ५॥

नासिकायांच सौभाग्यं नासाग्रे व्य
सनं भवेत्॥ लाभस्तु दक्षिणे कर्णे
वामे कर्णे च दुःखभाक्॥ ६॥

अर्थ॥ नाकावर पडली असतां सौभाग्य जाणावें॥ नाकाच्या अग्रभागीं पडली असतां दुःख प्राप्त होईल॥ उजव्या कानावर पडली असतां लाभ होतो॥ डाव्या कानावर पडली असतां दुःख प्राप्त होतें॥ ६

गंडप्रदेशयोर्मध्ये भोजनं परिकी
र्तितं॥ अधरोष्टे धनैश्वर्यमूर्ध्वोष्ठ
कलहो भवेत्॥ ७॥

अर्थ॥ गालाच्या मध्यभागीं जर पडली तर जेवण मिळेल असें सांगीतलें आहे॥ मनुष्याच्या खाल च्या ओंठावर जर पडली तर द्रव्य ऐश्वर्य मिळेल

आणि वरच्या ओठावर पडली असतां कलह हो ईल असें जाणावें॥ ७॥

संपुटे मृत्युमाप्नोति चुबुके राजवि ग्रहं॥ सुहृदागमनं कंठे बहिः कं ठे रिपोर्भयं॥ ८॥

अर्थ॥ ओष्ठ संपुटाचें ठायीं पडली असतां मरणा तें पावतो॥ चुबुकावर (ह्मणजे ओष्ठाचे खालीं आणि हनुवटीच्यावर) पडली असतां राज्याब रोबर द्वेष घडेल असें जाणावें॥ कंठावर पडली असतां मित्राचें आगमन होईल॥ कंठाच्या बाह र पडली असतां शत्रूपासून भय प्राप्त होतें॥ ८

विजयं दक्षिणस्कंधे वामस्कंधे प राजयं॥ अर्थहानिः करे प्रोक्ता मणि

वंघेविभूषणं॥९॥

अर्थ॥उजव्या खांद्यावर पडली असतां जयप्राप्त होतो॥ आणि डाव्या खांद्यावर पडली असतां पराजय होतो॥ हस्तावर पडली असतां द्रव्यनाश होतो॥ मणगटावर पडली असतां अलंकार प्राप्त होतो॥९॥

करपृष्ठेर्थहानिःस्यादंगुलीषुप्रियागमः॥नखेषु धनहानिःस्यात्करमध्येमहत्सुखं॥१०॥

अर्थ॥ हस्ताच्या पृष्ठभागावर पडली असतां द्रव्यनाशच जाणावा॥ बोटावर पडली असतां इष्ट पदार्थ प्राप्ति जाणावी॥नखावर पडली तर द्रव्यनाश होतो॥ हस्ताच्या मध्यभागीं पड

ली असतां महत्सुख होईल असें जाणावें ॥ १० ॥

पृष्ठे परोक्षवार्ताच पार्श्वयोर्बंधुदर्शनं ॥ उदरे धनसंप्राप्तिर्हृदि सौख्यविवर्धनं ॥ ११ ॥

अर्थ ॥ पाठीवर पाल पडली असतां आपल्या मित्राची बातमी समजेल ॥ दोहीं कुशीवर पडली असतां बंधूची भेट होईल ॥ पोटावर पडली तर द्रव्य लाभ होईल ॥ हृदयाचेंठाईं पडली असतां सौख्य वृध्दि होईल असें जाणावें ॥ ११ ॥

स्तनयुग्मे च सौभाग्यं कक्षयोस्त्रीसुखावहं ॥ वामे बाहौ बहुक्लेशं यशः स्याद्दक्ष बाहुके ॥ १२ ॥

अर्थ ॥ पुरुषाच्या स्तनद्वयाचें ठाईं पाल पडली तर

सौभाग्य प्राप्त होतें ॥ उभय कारवेच्याठायीं पतन पावली असतां स्त्रियांस सुख प्राप्त होतें ॥ डाव्या बाहूवर पडली असतां बहुत कुश होतात ॥ उजव्या बाहूवर पडली असतां यशःप्राप्ति होती ॥ १२

करे कलहं च कलहं मणिबंधे धनापहं ॥ करपृष्ठेचांगुलीषु भूषणं हानिकृन्नखे ॥ १३ ॥

अर्थ ॥ डाव्या हातावर पडली असतां कुटुंबासी कलह होतो ॥ आणि डाव्या मणगटावर पतन पावली असतां द्रव्य नाश होतो ॥ डाव्या हाताच्या पृष्ठभागावर आणि बोटावर पडली असतां भूषण प्राप्ती होईल ॥ डाव्या हाताच्या नखावर पडली असतां नाश होईल असें जाणावें ॥ १३

करमध्ये धनप्राप्तिः कण्ठ्यां वस्त्रावि
भूषणं॥जयःकीर्त्तिर्भवेन्नाभौ वं
धने व्याधिबंधनं॥१४॥

अर्थ॥ डाव्या हाताच्या मध्यभागीं पाल पडली असतां धन प्राप्ति होईल॥ कंठावर पडली असतां वस्त्र व अळंकार प्राप्त होईल॥ नाभीवर पडली असतां जय आणि कीर्त्ति प्राप्त होईल॥ बंधनाचे ठायीं (ह्मणजे बस्तीवर) पडली असतां रोग प्राप्ति जाणावी॥१४॥

गुह्यस्थाने मृतिर्ज्ञेयाऊर्वोस्तु वस्त्र
हानिकृत्॥जघने धननाशाय गु
देरोगसमागमः॥१५॥

अर्थ॥ गुह्यस्थानीं पडली असतां मरण जाणावें॥

आणि मांड्यावर पडली असतां वस्त्रांचा नाश जा
णावा॥ जघनाचे ठायीं ( ह्मणजे कंबरेच्या पुढल्या
बाजूवर ) पडली असतां द्रव्य नाश होतो॥ गुद
स्थानीं पडली असतां रोग प्राप्ति जाणावी॥१५॥

जान्वोस्तु बंधनं प्रोक्तं गुल्फयोः स्त्री
विनाशनं॥ जंघयोर्गमनं प्रोक्तं पाद
योर्बंधनं तथा॥१६॥

अर्थ॥ दोन्ही गुडघ्यावर पडली असतां बंधन
प्राप्त होईल असें जाणावें॥ घोट्यावर पडली
असतां स्त्रीचा नाश जाणावा॥ जंघावर ( ह्मण
जे दोन्ही गुडघ्याच्या खालीं पायापर्यंत ) पडली
असतां प्रवास घडेल असें जाणावें॥ दोन्ही पाया
वर पडली असतां बंधन प्राप्तिच असें फळ जा॰
॥१६॥

खुरयोर्मृत्युमाप्नोति पादपृष्ठे सुख
प्रदं॥ पादांगुल्यां पुत्रनाशं पशुभृ
त्यान्नरेषु च॥१७॥

अर्थ॥ खुर (ह्मणजे लक्षणं करून जोडलेले पाय) यांवर पडली असतां मृत्यु प्राप्ति॥ टांचेवर पडली तर सुख प्राप्ति॥ पायांच्या बोटावर पडली तर पुत्र नाश॥ पायाच्या नखावर पडली असतां पशु व चाकर यांचा नाश॥१७॥

शत्रुक्षयो भवेत्पादतले चैवं विनि
र्णयः॥ यदुक्तं तु फलादेशं यत्न की
र्यं प्रकीर्त्तितं॥१८॥

अर्थ॥ पायाच्या तळव्यावर पडली असतां शत्रूचा नाश होईल असा निश्चय शास्त्रांत केला आहे॥

र्थ पर्यंत जें फळ सांगीतलें तें सर्व आपल्या मनमान होईल असें जाणावें॥१८॥

शयनेसंस्थितेपल्लीपतितायदिदृ
श्यते॥नदाशुभफलंनस्यादशुभं
चधनंसदा॥१९॥

अर्थ॥ शयनावर निजतां जर पाल पडली तर शुभ फळ नाहीं तर अशुभ असें जाणावें॥१९॥

उपविष्टासनेपल्लीपतितायदिदृ
श्यते॥शुभाशुभफलंचैवनत्तथै
वभविष्यति॥२०॥

अर्थ॥आसनाचे ठायीं बसल्यावर जर पाल पडली असें पाहिलें तर आपल्या बंधूंसी आपलें सख्य होईल असें जाणावें॥२०॥

उच्छिष्टे संस्थिता पल्ली पतिता य
दि दृश्यते॥ पतने फलमादिष्टं बंधू
नां चैव सौख्यदं॥२१॥

अर्थ॥ आपल्या पात्रावर जें उच्छिष्ट अन्न त्याचे
ठायीं पाल पडतांना जर पाहिली तर बंधूचें पर
स्पर सख्य होईल असें जाणावें॥२१॥

गम्यमाने च पल्ली तु पतिता च भ
वेद्यदि॥ यथोक्तफलमादेश्यं शत्रू
णां फलनिश्चयः॥२२॥

अर्थ॥ आपण गमन करित असतां जर आप
ल्या अंगावर पडली तर जें फळ सांगितलें तें फ
ळ आपले शत्रूस होईल असें जाणावें॥२२॥

आहारे पतिता पल्ली तदाहारं परि

त्यजेत्॥ विनान्नं पतितापात्रे व्या
धिशोकभयप्रदा॥ २३॥

अर्थ॥ जेवावयाचें जें अन्न त्या अन्नावर पाल प
डली असतां तें अन्न टाकून द्यावें॥ अन्न रहित
पात्राचे ठाई पडली असतां ती पाल व्याधि शोक
आणि भय यातें देणारी असें जाणावें॥ २३॥

पचनाग्नौ पतेत्पल्ली गृहिणी मृत्यु
माप्नुयात्॥ देवालये तु राज्ञश्च स
भामध्ये सभापतिः॥ २४॥

अर्थ॥ ज्या अग्नीवर स्वयपाक करावयाचा त्या
अग्नीचे ठायीं जर पडली तर बायको मरेल॥
व ज्याच्या देवळांत जर पडली तर राजाचा ना
श॥ सभामध्यें पडली तर सभापतिचा नाश॥ २४

गृहमध्ये गृहस्थस्यद्वयोर्मध्येन
रोत्तमः॥ पल्योः परस्परं युध्धे पति
ता यदि दृश्यते॥ सर्वदुःखविनाशा
य सुखदं गृहवासिनां॥२५॥

अर्थ॥ घराच्या मध्य भागींच जर पडेल तर घर धन्याचा नाश होईल॥ दोघांच्या मध्यभागींच जर पडेल तर दोघांत जो उत्तम त्याचा नाश जाणावा॥ पालीचें परस्पर युध्ध होत असतां जर खालीं पडलेली पाहिली तर सर्व दुःखाचा नाश होईल आणि घरांत राहणाऱ्या माणसांस सुख प्राप्ति जाणावी॥२५॥

यदि पल्याः प्रपातेन दीपो नाशयते
गृहे॥ तद्गृहं नाशमायाति त्यजेन्मा

राचयेत्तत्सः॥२६॥

अर्थ॥ पालीच्या पडण्यानें जर घरांतला दिवा गेला तर तें घर नाश पावतें॥ यास्तव तीन महिनें पर्यंत त्या घरांत राहूं नये॥२६॥

पल्याःप्रपतनं वस्त्रभूषणेचैव दृश्यते॥ मानहानिर्भवेत्तस्य कलहोवाभविष्यति॥२७॥

अर्थ॥ आपलें वस्त्र व अळंकार यांजवर जर पाल पडतांना दृष्टीस पडली तर आपल्या योग्यतेचा नाश किंवा कलह होईल असें जाणावें॥२७॥

आयुधेषुच दृश्येत यदि पल्याःप्रपातनं॥ स्वहस्तयुध्यमाप्नोति शत्रुहानिस्तदा भवेत्॥२८॥

अर्थ॥ तरवार इत्यादिक आयुधाकरून प्रालेप डली तर आपल्या हस्तें करून शत्रूसीं युद्ध होउन त्यामध्यें शत्रूंचा नाश होईल॥२८॥

वाहने संप्रदृश्येत गमनं परिदूषितं॥२९॥

अर्थ॥ आपलें जें अश्वादिक वाहन याचे ठाईं जर पाल पडली तर कष्टयुक्त प्रवास होईल असें फळ आहे॥२९॥

---

अन्यदृक्षादिभेदेन फलभेदो भवेद्ध्रुवं॥ स्वजन्मदिवसे जन्म नक्षत्रे नैधने विधौ॥३०॥

अर्थ॥ आतां कोणत्या नक्षत्रावर व कोणत्या दिव

गीं शास्त्रपद्धती असतनां काय फळ हें सांगतों॥ आपल्याजन्मदिवसीं किंवा जन्मनक्षत्र दिवसीं अथवा आपल्यास बारावा चंद्र असेल त्या दिवसीं॥३०॥

वैधृतौचव्यतीपातेउत्पातग्रहणा
दिषु॥यमघंटमृत्युदग्धेदिनचका
लनाडिके॥३१॥

अर्थ॥ वैधृति, व्यतीपात, उत्पात दिवस, ग्रहणादिक, यमघंटा, मृत्युयोग, दग्धयोग, काळनाडिका॥३१॥

विषनाड्यांक्रूरयुतेलग्नेक्रूरनि
रीक्षिते॥कालेष्वेवंविजानीयाद्य
दुक्तंनहिशोभनं॥३२॥

अर्थ॥ विषनाडी, पापग्रह युक्त व पापग्रहानें अ
वलोकित असें लग्न, इत्यादिक कार्यांजरी पाल
चांगल्या ठिकाणीं पडली तरीं जें फळ पूर्वी सांगि
तलें तें फळ न होतां वाईट फळ प्राप्त होईल॥ ३२

दुर्निमित्ते तथाजाते निधनं ज्ञा
यते ध्रुवं॥ इति पल्याः प्रपातेन फ
लं ज्ञेयं विचक्षणैः॥ ३३॥

अर्थ॥ त्याच रितीकरून दुर्निमित्त झालें असतां
निश्चयेंकरून नाश होतो असें जाणावें॥ या प्र
कारें करून कुशल पुरुषानी पालीच्या पडण्या
चें फळ समजावें॥ ३३॥

एतदेव फलं विंद्यात्सरटस्य प्ररोहणे
॥ पल्याः प्रपातनं चैव सरटस्य नरा

हृणं॥ ३४॥

अर्थ॥ आणि हेंच पूर्वोक्त फळ सरड अंगावर चढ ता असतां जाणावें॥ पालीचें पडणें आणि सरडा चें नरोहणं॥ ३४॥

निधनार्थाय भवति शुभं विद्याद्वि
पर्यये॥ पतनानंतरं यस्यारोहणं
यदि जायते॥ पतने फलमुत्कृष्टं रो
हणेल्प फलं भवेत्॥ ३५॥

अर्थ॥ हीं दोन्ही नाशार्थ होतात॥ परंतु विपर्यय असतां शुभ जाणावें॥ सरड अंगावर पडून जर चढला तर पडण्याचें फळ उत्तम आणि नुस्त्या च ढण्याचें फळ त्यापेक्षां कमी असें समजावें॥ ३५

आरोहणंचोर्ध्ववक्रमधोवक्रंतु
पातनं॥ भवेद्यदिचशीघ्रेणतत्फ
लंजायते ध्रुवं॥ ३६॥

अर्थ॥ आतां आरोहण व पतन यांचीं लक्षणे सां गतों॥ तोंड वर करून जर अंगावर चढला तर त्या ला आरोहण ह्मणावें॥ आणि खालीं तोंड करून जर उतरला तर त्याला पातन ह्मणावें॥ असें ल क्षण युक्त सरडाचें आरोहण व पतन जर झालें तर शीघ्र फळ प्राप्ति होईल असा निश्चय आहे॥

पल्याःस्पर्शनमात्रेणसचैलंस्नान
माचरेत्॥ पंचगव्यंतथाप्राश्यकु
र्यादाज्यावलोकनं॥ ३७॥

अर्थ॥ आतां पुन्हा पाली विषयीं कांहीं प्रकार सां

गतों॥ पाल्कीचा स्पर्श झाला असतां लागलेंच व
स्त्रासुद्धां स्नान करावें॥ आणि पंचगव्य प्राशन क
रून तुपामध्यें आपलें मुख पाहावें॥ ३७॥

अशक्तोवासशक्तोवायदीच्छेच्छु
भमात्मनः॥ पुण्याहंवाचयित्वातु
शांतिकर्मसमाचरेत्॥ ३८॥

अर्थ॥ अशक्त असो अथवा शक्तिमान् असो ज्या
ला आपल्या कल्याणाची गरज आहे त्यानें अगो
दर असें करावें नंतर पुण्याह वाचन करून शांति
कर्म आचरण करावें॥ ३८॥

प्रतिरूपंसुवर्णेननदद्यैनचवापुनः
॥ नदद्याच्चयथाशक्त्याविक्तशाठ्यं
नकारयेत्॥ ३९॥

अर्थ॥ आतां शांतीचा प्रकार संक्षेपाने सांगतो॥ दाहा पळ सुवर्णाची अथवा पांच पळ सुवर्णाची पालीची प्रतिमा करावी॥ इतकें आपलें सामर्थ्य नसेल तर यथाशक्ति वित्त शाठ्य न करितां सुवर्णाची प्रतिमा करावी॥ ३९॥

रक्तवस्त्रेणसंवेष्ट्यगंधपुष्पैःसुपूजयेत्॥ तस्याग्रेमृन्मयंरम्यंकलशंजलपूरितं॥ ४०॥

अर्थ॥ ती प्रतिमा तांबड्या वस्त्रें करून वेष्टित करावी॥ नंतर गंध फुलानी तिचें पूजन करावें॥ मग त्या प्रतिमेच्या पुढें मृत्तिकेचा चांगला घट पाण्यानें भरावा॥ ४०॥

वस्त्रमाल्यैरलंकृत्यस्थापयेत्तंदु

ल्लोपरि॥ पंचामृतं पंच गव्यं पंच
रत्नसमन्वितं॥ ४१॥

अर्थ॥ आणि वस्त्र पुष्पं यही करून तो कलश अलंकृत करून नांदळावर स्थापन करावा॥ त्या घटाचे ठाई पंचामृत पंच गव्य पंच रत्नें॥ ४१॥

पंचत्वक् पंच पत्रं तु निक्षिप्या
त्सप्तमृत्तिकेः॥ पूजयेल्लोकपालां
स्तु गंधपुष्पाक्षतादिभिः॥ संपू
ज्य विधिवद्भक्त्या तत्तन्मंत्रैश्च मं
त्रवित्॥ ४२॥

अर्थ॥ पांच साली पांच पत्री आणि सप्तमृत्तिका टाकाव्या॥ मग गंध पुष्प अक्षतादिकें करून त्यांच्या त्यांच्या मंत्रांनी भक्ती करून मंत्रज्ञ पुरुषा

ने लोकपाल जे इंद्रादिक यांची पूजा करावी॥ ४२॥

अग्निसंस्थापनं कृत्वा होमकर्म
समारभेत्॥ मृत्युंजयेति मंत्रेण
समिद्भिः खादिरैः शुभैः॥ ४३॥

अर्थ॥ नंतर अग्निस्थापन करावें॥ मग मृत्युंजया
च्या मंत्रें करून आणि चांगल्या खैराच्या समिधा
नी अग्नीचें ठाई होम करावयास आरंभ करावा
॥ ४३॥

तिलैर्व्याहृतिभिर्होम अष्टोत्तरस
हस्रकं॥ अथवाष्टोत्तरशतं कुर्या
त्सम्यक्समाहितः॥ ४४॥

अर्थ॥ आणखी एकाग्र चित्त होऊन व्याहृति
ह्मणून अष्टोत्तर सहस्र अथवा अष्टोत्तर शत
चांगला तिळांचा होम करावा॥ ४४॥

अभिषेकं तनः कुर्यात्तदुक्तद्विज
सत्तमैः॥ पुण्यैर्वारुणसूक्तैर्वाशं
तिसूक्तैस्तथैवच॥ ४५॥

अर्थ॥ ह्नाम समाप्त झाल्यावर पुण्य कारक वरु
ण सूक्त, व शांति सूक्ते यांही करून ब्राह्मणानी
यजमानाच्या मस्तकावर अभिषेक करावा॥
४५

एवं सम्यक्विधानेन शांति कर्म
करोति यः॥ तस्यायुः श्रीर्जयो वृ
धिर्यशोरोगश्चजायते॥ ४६॥

अर्थ॥ आशा चांगल्या विधानें करून जो शां
ति कर्माचें आचरण करितो त्याला आयुष्य.
श्री.जय.वृध्दि.यश.आरोग्य हीं प्राप्त होतात॥ ४६

पल्लीसरटयोःशांतिविधानंशौन
कोदितं॥ यःसमारभतेतस्यनि
र्विघ्नंजायतेध्रुवं॥ ४७॥

अर्थ॥ पाल व सरड यांच्या शांतिचें विधान शौ
नकऋषीनी सांगीतलें आहे॥ त्या प्रमाणें जो आ
रंभ करितो त्याला विघ्नांची पीडा होत नाहीं॥ ४७॥

इति पल्ली सरटयोःशांतिःसमाप्त.॥

---

आतां स्त्रियांच्या अंगावर पाल पडली अ
सतां काय फळतें सांगतों.

अथस्त्रीणांविशेषेणफलंपल्याः
प्रपातने॥ तत्तत्स्थानविशेषेणज्ञा
तव्यंसुविचक्षणैः॥ १॥

अर्थ॥ यानंतर स्त्रियांच्या अंगावर त्या त्या स्थानीं पाल पडली असतां विशेषें करून फल सांगतों॥ तें कुशल पुरुषानीं जाणावें॥१॥

शिरसि श्रियमाप्नोति ब्रह्मस्थाने मृ
निमदा॥ केशबंधे रोगबंधः केशां
ते मरणं भवेत्॥२॥

अर्थ॥ स्त्रियांच्या मस्तकांवर पाल पडलीअसतां लक्ष्मी प्राप्त होती॥ आणि टाळूवर पडली असतां मृत्यु देणारी जाणावी॥ वेणीवर पडली तर रोग प्राप्ति॥ आणि केशाच्या अग्रावर पडली तर मरण प्राप्ति असें जाणावें॥२॥

ग्रीवायां कलहो नित्यं ललाटे च ध
नक्षयः॥ दक्षे कपोले विधवा वा

मेच प्रियदर्शनं ॥३॥

अर्थ॥ [illegible]वर पडली असतां नित्य कलह होतो॥ कपाळावर पडली असतां द्रव्य नाश होतो॥ उजव्या गालावर पडली असतां विधवा होईल असें जाणावें॥ डाव्या गालावर पाल पडली तर आपल्या प्रियाचें दर्शन होईल असें समजावें॥३॥

दीर्घायुर्दक्षिणे कर्णे वामे स्वर्णवि
भूषणं॥ दक्षिणे नयने दुःखं वामे
वल्लभदर्शनं ॥४॥

अर्थ॥ उजव्या कानावर पडली असतां दीर्घ आयुष्य असें जाणावें॥ डाव्या कानावर पडली असतां सुवर्णालंकार मिळेल असें जाणावें॥

उजव्या नेत्रावर पडली असतां दुःख॥ आणि डा
व्या नेत्रावर पडली असतां पतीचें दर्शन होईल
॥४॥

नासायां रोगसंप्राप्तिरूर्ध्वोष्ठे क
लहो भवेत्॥ अधरोष्ठे धनैश्वर्यं
संपुटे निधनं भवेत्॥५॥

अर्थ॥ नाकावर पाल पडली असतां रोग प्राप्ति
जाणावी॥ वरच्या ओंठावर पडली असतां कल
ह होईल॥ खालच्या ओंठावर पडली तर द्रव्य
व ऐश्वर्य यांची प्राप्ति होईल॥ ओष्ठसंपुटावर प
डली तर नाश होतो॥५॥

चुबुके विग्रहः प्रोक्तो वक्रे मिष्टा
न्नभोजनं॥ कंठे विभूषणं प्रोक्तं
कक्षयोः सुखसंपदः॥६॥

अर्थ॥ चुबुक (ह्मणजे खालच्या ओंठ खालचा व हनुवटीच्या वरचा जो भाग तो) त्यावर जर पाल पडली तर कलह होईल॥ आणि तोंडांत जर पडली तर मिष्टान्नाचें जेवण मिळेल॥ कंठावर पडली असतां अळंकार प्राप्ति होईल॥ दोन्ही कांखेवर पडली असतां सुख संपत्ति प्राप्त होईल॥ ६॥

पृष्ठे बंधुवियोगः स्यात्पार्श्वयो
र्बंधुदर्शनं॥ स्कंधयोः स्त्रीसुखा
वाप्तिर्बाह्वोर्मणिभूषणं॥ ७॥

अर्थ॥ स्त्रियांच्या पाठीवर पाल पडली असतां बंधूचा वियोग होईल॥ आणि दोन्ही कुसीवर पडली असतां बंधूची भेट होईल॥ दोन्ही खांद्या

वर पडली असतां आपल्यास सुख प्राप्ति जाणा
वी॥ दंडावर पडली असतां मणिरत्न अलंका
र प्राप्ति जाणावी॥ ७॥

अर्थहानि: करे प्रोक्ता वामे लाभो
भवेद्ध्रुवं॥ दक्षिणे मणिबंधेच म
नस्तापो धनक्षय:॥ ८॥

अर्थ॥ उजव्या हातावर पडली असतां द्रव्याचा
नाश जाणावा॥ डाव्या हातावर पडली असतां
लाभ होईल॥ उजव्या मणगटावर पडली तर मनाला
संताप व द्रव्य नाश होतो॥ ८॥

वामे विभूषणं प्रोक्तं करमध्ये
महत्सुखं॥ करपृष्टे करांगुल्यां
भूषणं हानि रुन्नखे॥ ९॥

अर्थ॥ डाव्या मणगटावर पाल पडली तर अलं कार प्राप्ति होती॥ दोही हाताच्या मध्यभागीं जर पडली तर महत्सुख॥ त्याप्रमाणेंच उभय हस्ताच्या पृष्ठभागीं किंवा बाहावर पडली असतां अलंकार प्राप्ति होती॥ परंतु नखावर पडली असतां नाश होतो असें जाणावें॥ ९॥

स्तनयोर्बहुदुःखं स्याद्धृदि सौ
ख्यविवर्धनं॥ कुक्षौ सत्पुत्रलाभः
स्यादुदरे द्वाहमंगलं॥ १०॥

अर्थ॥ दोन्ही स्तनावर पडली असतां बहुत दुःख होईल॥ हृदयाचे ठाई पडली असतां सौख्य वृद्धि होईल॥ कुक्षीचे ठाई पडली असतां सत्पुत्राची प्राप्ति होईल॥ आणि कन्येच्या पोटावर पडली असतां

नग्न होईल असें जाणावें॥ इतर स्त्रियांच्या पोटाव
र पडली असतां मंगल ह्मणजे कांहीं शुभ होईल
असें जाणावें॥१०॥

नाभौ सत्कीर्त्तिवृद्धिः स्याद्गुह्यस्था
ने मृतिर्भवेत्॥ कट्यांचवस्त्रला
भः स्याद्गुदे रोगसमुद्भवः॥११॥

अर्थ॥ स्त्रियांच्या नाभीवर पडली असतां सत्कीर्त्ति
ची वृद्धि होईल॥ गुह्यस्थानीं पडली असतां मर
ण प्राप्ति॥ कंबरेवर पडली असतां वस्त्राचा लाभ
होईल॥ गुदस्थानीं पडली तर रोगाचा उद्भव हो
ईल असें जाणावें॥११॥

ऊर्वोरपत्यसंप्राप्तिर्जान्वोर्बंधन
मेवच॥ जंघयोरर्थहानिः स्या

द्गुल्फयोर्मरणं भवेत् ॥१२॥

अर्थ॥ दोन्ही मांड्यावर पाल पडली असतां कन्या किंवा पुत्र होईल॥ उभय गुडघ्यावर पडली असतां बंधन प्राप्ति॥ आणि जंघेवर (ह्मणजे गुडघ्यापासून पायापर्यंत) पतन पावली असतां द्रव्याचा नाश होतो॥ आणि उभय घोट्यावर पडली असतां मरण प्राप्ति होईल असे जाणावें॥१२

दक्षिणे चरणे यानं वामे शत्रुविनाशनं॥ अंगुली ष्वात्मजाः कोशो धान्यलाभो नखेषु च॥१३॥

अर्थ॥ उजव्या पायावर पाल पडली असतां गांवास जाणें होईल॥ डाव्या पायावर पडली असतां शत्रूचा नाश होईल॥ पायाच्या बोटावर पड

त्यास पुत्र व पुष्कळ द्रव्य प्राप्ति होईल॥ आणि पायाच्या नखांवर पडली असतां धान्य प्राप्ति॥ असें जाणावें॥१३॥

इतिपल्लीसरटयोःपतनाद्रोहणादपि॥ स्त्रीणांज्ञेयंविशेषेणयदुक्तं मुनिपुंगवैः॥१४॥

अर्थ॥ याप्रकारें करून पालीच्या पडण्याचें व सरड चढण्याचें फळ विशेषें करून ऋषींनी स्त्रियांस सांगीतलें आहे तें जाणावें॥१४॥

॥अथ दिशा फलं॥

पूर्वस्यां चिंतितं कार्यमाग्नेय्याम
ग्निजं भयं॥ याम्ये तु मरणं विद्या
न्नैर्ऋत्यां कलहो भवेत्॥१॥

अर्थ॥ आतां आपल्या अंगावर पाल पडल्यावर ती जर पूर्वे कडेस जाईल तर ज्याच्या अंगावर पडली त्याचें चिंतिलें कार्य सिद्धीस पावेल॥ अग्नि दिशे कडे जर गेली तर अग्निपासून भय जाणावें॥ दक्षिण दिशेस गेली तर मरण प्राप्ति जाणावी॥ नैर्ऋत्य दिशेस जर गेली तर कलह होईल असें जाणावें॥१॥

पश्चिमे धनलाभाय वायव्यां व्या
धिसंभवः॥ कौबेर्यां कीर्तिलाभः

स्यादीशान्यांचिंतितंभवेत्॥ पतनानंतरंपल्यागतायाःफलमुदिशंत॥२॥

अर्थ॥ पश्चिमदिशेस गेली तर द्रव्य लाभ जाणावा॥ वायव्य दिशेस गेली तर रोग प्राप्ति॥ उत्तर दिशेस गेली तर कीर्ति लाभ होईल॥ इशानी दिशेस जर गेली तर चिंतिले कार्य होईल॥ हें सांगीतलें फळ पाल अंगावर पडुन गेली असतां जाणावें॥ ॥२॥

---

॥अथतिथिफलं॥

प्रतिपल्लोकसंप्राप्तिर्द्वितीयाराज्यदायिनी॥ तृतीयायांभवेल्लाभश्चतुर्थ्यांरोगएवच॥१॥

अर्थ॥ आतां तिथीचें फळ सांगतों॥ प्रतिपदेचे दिवसीं पाल अंगावर पडली असतां सर्व लोक अनुकूळ होतात॥ द्वितीयेचे दिवसीं पडली असतां राज्य प्राप्ति होईल॥ तृतीयेचे दिवसीं पडली असतां लाभ होईल॥ चतुर्थीचे दिवसीं पडली असतां रोग प्राप्ति असें जाणावें॥१॥ ॥६॥ ॥५

पंचम्यां च तथ षष्ठ्यां वा सप्तम्यां च धनागमः॥ अष्टम्यां च नवम्यां च दशम्यां मरणं ध्रुवं॥२॥

अर्थ॥ पंचमी · षष्ठी · सप्तमी · त्या तीन दिवसीं पडली असतां धन प्राप्ति जाणावी॥ अष्टमी नवमी दशमी इतक्या दिवसीं पडली असतां मरण जाणावें॥२॥

एकादश्यां पुत्रलाभो द्वादश्यां पुत्रसंपदः॥ त्रयोदश्यां भवेद्धानिर्र्थनाशश्चतुर्दशी॥ ३॥

अर्थ॥ एकादशीचे दिवसीं पाल पडली असतां पुत्रलाभ होईल॥ द्वादशीचे दिवसीं पडली असतां पुत्रसंपत्ति प्राप्त होईल॥ त्रयोदशीचे दिवसीं पडली असतां हानि जाणावी॥ चतुर्दशीचे दिवसीं पडली असतां द्रव्यनाश होईल असें जाणावें॥ ॥३॥

पंचदश्याममावास्यां बंधुहानिर्धनक्षयः॥ ४॥

अर्थ॥ पौर्णिमा आणि अमावास्या या दिवसीं पडली असतां बंधुहानि व द्रव्यनाश अनुक्रमें फळ जाणावें॥ ४॥

॥अथ वार फलं॥

सोमे बुधे गुरो शुक्रे धन लभः प्र
जायते॥ भानौ भौमे तथा मंदे ध
न हानिः प्रजायते॥१॥

अर्थ॥ आतां वाराचें फळ सांगतों॥ सोमवार, बु
धवार. गुरुवार. शुक्रवार. त्या दिवसीं जर पाल
पडली तर धन लाभ होतो॥ आदित्यवार मंगळवार
शनिवार. इतक्या दिवसीं पडली असतां द्रव्य ना
श होतो॥१॥

॥अथ नक्षत्र फलं॥

अश्विन्यामायुरारोग्यं भरण्यां
रोग एव च॥ कृत्तिका धन हानिः
स्याद्ब्राह्मे चांद्रे च संपदः॥१॥

अर्थ॥ आतां नक्षत्र फळ सांगतों॥ अश्विनी वर पाल पडली असतां आयुष्य आणि आरोग्य प्राप्ति होती॥ भरणी वर पडली असतां रोग प्राप्ति जाणावी॥ कृत्तिका वर पडली तर धन हानि जाणावी॥ रोहिणी आणि मृग यांजवर पडली असतां संपत्ति प्राप्त होईल असे जाणावें॥१॥

आर्द्रायांच भवेन्मृत्युर्धनलाभः
पुनर्वसौ॥पुष्ये चैव भवेल्लाभः
सार्पेच्च मरणं ध्रुवं॥२॥

अर्थ॥ आर्द्रा वर पडली असतां मृत्यु प्राप्त होईल पुनर्वसू वर पडली असतां धन लाभ होईल॥ पुष्य नक्षत्रा वर पडली तर लाभ होईल॥ आश्लेषा वर पडल्यास निश्चयें करून मरण जाणावें॥ २॥

मघाक्षेमकरी प्रोक्तापूर्वायांरोग संपदः॥उत्तरादिचतुष्केषु शुभं भवतिनिश्चितं॥३॥

अर्थ॥ मघा नक्षत्रावर पाल पडली असतां कल्याण प्राप्ति होती॥ पूर्वा नक्षत्रावर पडली असता रोगाधिक्य जाणावें॥ उत्तरा. हस्त. चित्रा. स्वाती त्या च्यार नक्षत्रावर पडली असतांनिश्चयें करून शुभ फळ जाणावें॥३॥

विशाखाधननाशाय मैत्रे राज्यं विनिर्दिशेत्॥ज्येष्ठायांनिधनंप्रोक्तं मूळेचैवसुखागमः॥४॥

अर्थ॥ विशाखा वर पडली असतां धन नाश जाणावें॥ अनुराधा वर पडली असतां राज्य प्राप्ति जा

णावी ॥ ज्येष्ठा नक्षत्रावर पडली असतां नाश जा

णावा ॥ मूळावर पडली असतां सुख प्राप्ति जाणा

वी ॥ ४ ॥

पूर्वापाढा मृत्यवे स्यादुत्तराक्षेमका

रिणी ॥ श्रवणं राज्य संप्राप्तिर्धनिष्ठा

यां धनक्षयः ॥ ५ ॥

अर्थ ॥ पूर्वाषाढा वर पडली असतां मृत्यु प्राप्ति

जाणावी ॥ उत्तराषाढा वर पडल्यास कल्याण प्रा

प्ति जाणावी ॥ श्रवणा वर राज्य प्राप्ति ॥ धनिष्ठा वर

नाश जाणावा ॥ ५ ॥

शततारासु च सुखं पूर्वाभाद्रपदा

शुभा ॥ शुभोत्तराभाद्रपदा रेवत्यां

राज्य दायिनी ॥ ६ ॥

अर्थ॥ शततारका नक्षत्रावर पाल पडली असतां सुख प्राप्ति जाणावी॥ पूर्वाभाद्रपदावर पडली असतां शुभ जाणावें॥ उत्तराभाद्रपदावर शुभ॥ रेवती नक्षत्रावर राज्य प्राप्ति जाणावी॥ ६॥

॥ अथ लग्न फलं॥

मेषवृषेच लाभःस्यान्मिथुनेस्या
च्च कन्यका॥ कर्केवृद्धिःसुतःसिं
हे कन्यालग्ने धनक्षयः॥१॥

अर्थ॥ बारा लग्नावर पाल पडली असतां काय फळ आहे तें सांगतों॥ मेष-वृषभ-या लग्नावर पाल पडली असतां लाभ जाणावा॥ मिथुन लग्नावर पडली असतां कन्या होईल॥ कर्क लग्नावर पडली असतां आपला उत्कर्ष होईल असें जाणावें

सिंह लग्नावर पाल पडली असतां पुत्र प्राप्ति॥ कन्या लग्नावर पडली असतां द्रव्य नाश जाणावा॥१

तुला वृश्चिकयोर्वस्त्रं धनुर्मकर

योर्धनं॥ महाहानिः कुंभ लग्ने

मीने संतापकारिणी॥२॥

अर्थ॥ तुला वृश्चिक-या लग्नावर वस्त्र प्राप्ति जाणावी॥ धन मकर-या लग्नावर पडली असतां धन प्राप्ति जाणावी॥ कुंभ लग्नावर जर पडली तर मोठी हानि होईल॥ मीन लग्नावर संताप प्राप्ति जाणावी॥२॥

॥अथ योग फलं॥

शूल वज्र व्यतीपाते व्याघाते प

रिघे तथा॥ वैधृत्यां घातमित्याहु

रन्येयोगाःशुभावहा॥१॥

अर्थ॥ आतां योगाचें फळ सांगतों॥ शूल-कव्र व्यतीपात-व्याघात-परिघ-वैधृति-या योगांवर पाल पडली असतां नाश होईल॥ आणि यांशिवायजे योग त्यांवर पडली असतां शुभजाणावी॥१॥

॥अथ करण फळं॥

नागेचतुष्पदेशोकोभद्रायांमरणंध्रुवं॥ शेषाणिशुभदानिस्युःकरणानिसदैवहि॥१॥

अर्थ॥ आतां करण फल सांगतों॥ नाग-चतुष्पद-यांजवर पाल पडली असतां शोक कारकजाणावी॥ भद्रावर पडल्यासनिश्चयें करून मरणजाणावें॥ या शिवाय दुसऱ्याकरणांवर पाल

पडली आसतां [illegible] अंक जाणावी ॥ १ ॥ ६५ ॥

॥ इति षष्ठी सरटयोः फल कारिका ॥

॥ समाप्तः ॥

---

मुंबईत गणपत कृष्णाजी यांचे छापखान्यांत

छापिली शके १७६६

अश्विन मास

---